# जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

(आस्थापना विभाग)

2918

Email-rdc.hingoli123@ gmail.com
hingoliest@gmail.com

Phone-02456 221450
Fax No-02456 22400

वाचा :- 1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. पानिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ दि. 19/10/2007 व दिनांक 27/06/2008

2) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. 2011/प्र.क्र.72/ई-7/दि. 19/12/2011

3) या कार्यालयाची जाहिरात दि. 04/09/2012)

4) मा.जिल्हाधिकारी, परभणी यांचे पत्र दि. 03/12/2013

5) मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक 15.01.2016

6) कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. एस-30/2016/प्र.क्र.091/ई-7 दि. 18/07/2016 चे अवलोकन व्हावे.

जा.क्र.2016/अ-2/आस्था-1/कावी-

दिनांक :- 02/08/2016

## आ दे श

**ज्याअर्थी,** संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार लिपीक-टंकलेखक संवर्गातील सामाजिक आरक्षणांतर्गत समांतर आरक्षणातील रिक्त पदे भरुन काढण्यासाठी सन 2012 मधील सरळसेवा भरतीमध्ये दि. 19/10/2012 रोजी निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निवड व प्रतिक्षा यादीत खुला (अंशकालीन) प्रवर्गात श्री. जगन्नाथ वारकरे यांची निवड झाली होती श्री. वारकरे यांचे अंशकालीन प्रमाणपत्र वैधते बाबत तफावत असल्यामुळे त्यांची निवड रद्द करण्यात आली होती. प्रतिक्षा यादीतील श्री. राजु लाडंगे यांनी मा .महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ औरंगाबाद येथे प्रतिक्षा यादीतून निवड करणेसाठी मुळ अर्ज क्र. 533/2014 दाखल करण्यात आला होता. सदर प्रकणात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश दिनांक 15.01.2016 श्री.राजु लांडगे यांची लिपिक-टंकलेखक पदावर एक महिण्यात नेमणुक करावी असे निर्देश दिले आहेत. सदर आदेशा विरुध्द मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे अपिल दाखल करणेसाठी शासनाकडे परवानगी मिळणे बाबत विनंती करण्यात आली होती.

त्यानुसार संदर्भ क्र. 06 अन्वये मा. प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपिठ औरंगाबाद यांचे आदेश दि.15/01/2016 चे आदेशानुसार तात्काळ कार्यवाही करणे निर्देश प्राप्त झाले आहेत.

**त्याअर्थी,** श्री. राजु लाडंगे यांना वर्ग 3 मध्ये लिपीक-टंकलेखक या पदावर वेतनबंध 5200-20200 (ग्रेड पे - 1900) मध्ये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव व पत्ता | जन्म तारीख | ज्या प्रवर्गामधुन निवड झाली तो प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाणी |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | श्री. राजु किशन लांडगे | 15/01/1974 | खुला (अंशकालीन) | लिपीक श्री. बी.एस. गरड, तह. का. कळमनुरी यांचे से.नि.मुळे रिक्त पदी |

## अटि व शर्ती

1) नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी उक्त उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
2) उमदेवाराची नेमणुक केवळ तातुपुरत्या स्वरुपाची असुन त्यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता किंवा कोणतीही पुर्व सुचना न देता सेवेतुन कमी करण्यात येईल.

डि. सुचना अ =

3) उमेदवारास शासकीय सेवेचा राजीनामा द्यावयाच्या असल्यास त्यांनी 1 महिन्यापुर्वी या कार्यालयास लेखी कळविणे आवश्यकआहे. अथवा 1 महिन्याचा मुळ पगार शासनास जमा करावा लागेल.

4) उमेदवाराने शारीरिक स्वास्थ वैदयकीय दृष्या पात्र असल्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 अन्वये सक्षम वैद्यकीय प्राधिकारी यांच्या कडुन प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवुन 1 महिन्याच्या आत दाखल करणे बंधनकारक राहील.

5) उमेदवारास शासनाने विहीत केलेली विभागीय दुय्यम सेवा / महसुल अर्हता परिक्षा विहीत मुदतीत उतीर्ण होणे बंधनकारक राहील.

6) रुजु होताना उमेदवारास मुळ प्रमाणपत्रे सादर करावी लागेल, त्याशिवाय संबंधीत अधिकारी यांनी उमेदवारास रुजु करुन घेवु नये

7) उमेदवार माध्यमीक शालांत परिक्षा हिंदी व मराठी हे विषय घेवुन उत्तीर्ण नसल्यास त्यांना शासनाची एतदर्थ मंडळाची परिक्षा उतीर्ण करावी लागेल.

8) चारित्र्या बाबत पोलीस अहवालात उमेदवाराची वर्तुणुक चांगली न आढळुन आल्यास त्यांना सेवेतुन कमी करण्यात येईल.

9) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंनियो/ 1005-126-सेवा-4 दिनांक 31/10/2005 नुसार कार्यान्वीत करण्यात आलेली अंशदान निवृत्ती वेतन योजना उमेदवारास लागु राहील.

10) उमेदवाराने आदेशाच्या दिनांकापासुन पंधरा (15) दिवसाचे आत संबंधीत कार्यालयात रुजु होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची नेमणुक रद्द समजण्यात येईल.

11) उमेदवाराने सादर केलेली प्रमाणपत्रे अथवा कागदपत्रे खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास त्यास तात्काळ सेवेतुन कमी करण्यात येईल.

12) अंशकालीन प्रमाणपत्राचे आधारे यापुर्वी शासकीय सेवेचा लाभ घेतला असल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.

13) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रशिक्षण2000/प्रकरण-61/2001/39, दि.19/03/2003 नुसार संगणक अर्हता प्राप्त प्रमाणपत्र (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS - CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीचे दिनांकापासुन 2 (दोन) वर्षाचे आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा सेवा समाप्त होईल.

स्वाक्षरीत/-
(अनिल भंडारी)
जिल्हाधिकारी हिंगोली

प्रतिलीपी,

1) मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
2) अपर जिल्हाधिकारी, हिंगोली यांना माहितीस्तव.
3) जिल्हा कोषागार अधिकारी, हिंगोली
4) जिल्हा सेवा योजन अधिकारी हिंगोली / परभणी यांना माहितीस्तव.
5) उपविभागीय अधिकारी, हिंगोली / वसमत / कळमनुरी यांना माहितीस्तव.
6) या कार्यालयाचे लेखा शाखेस माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
7) स्थाई आदेश संचिका.
8) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र हिंगोली यांना या जिल्ह्याचे संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.
9) संबंधितास अनुपालनास्तव.

जिल्हाधिकारी हिंगोली करिता